जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२१/१०/२०२३
## दि.२१/१०/२०२३ रोजी दु १६/०० वा.ते २१/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे २२३/२०२२,भादविक ४५७,३८० |
| **फिर्यादी** | एक महिला वय ५६ वर्षे रा.बिबवेवाडी पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०५/०९/२०२३ रोजी पहाटे ०४/०० ते ०५/०० वा.चे दरम्यान फ्लॅट ए-४, किमया अपार्टमेंट,महावीर इलेक्ट्रॉनिक्सच्या मागे,यश लॉन्स रोड,बिबवेवाडी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहते फ्लॅटचे लोखंडी सेफ्टी डोअरचे लॅच व लाकडी दरवाजाचे कुलूप व लॅच लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे लोखंडी सेफ्टी डोअर व लाकडी दरवाजाचे लॅच व कुलूप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरुम मधील कपाटामध्ये ठेवलेले रोख २,६५,०००/- रु.सोन्याचे व चांदीचे दागिने असा एकुण ५,५१,५००/- रु.किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला.<br>फिर्यादी हया परदेशी त्याचे मुलाकडे राहणेस असल्याने येथून भारत देशात येताच समक्ष येवून बिबववोडी पोलीस ठाणे येथे तक्रार देताच लागलीच गुन्हा दाखल केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.संजय आदलिंग,मो.नं.९०२८०४५४५४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो.स्टे.५४५/२०२२,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३४(अ)(ब) |
| **फिर्यादी** | सुनिल कुसाळकर पो.अमंलदार विमानतळ पो.स्टे पुणे शहर |
| **आरोपीत** | कंटेनर चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/१०/२०२३ रोजी रात्रौ ०१/३० वा.चे सुमारस मारुती सुझुकी शोरुम समोर विमाननगर चौक पुणे नगर वाहिनीवर नगर पुणे रोड विमाननगर पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कंटेनर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार संदेश संजय सोनावणे वय ३२ वर्षे रा.पोरवाल रोड लोहगाव ता.हवेली जि.पुणे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.देशमुख मो.नं.८४२१०३१५७३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**